सकाळ



कोल्हापूर : बसव परिषदेतर्फे ११ हजार रुपयांची ग्रंथभेट विद्यापीठाला देण्यात आली. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्याकडे डॉ. जी. पी. माळी यांच्या हस्ते ग्रंथ सुपूर्द करण्यात आले. यावेळी सरलताई पाटील, राजशेखर तंबाके, बाबूराव तारळी, सुभाष झगडे आदी उपस्थित होते.

# शिवाजी विद्यापीठाला बसव केंद्रातर्फे ११ हजारांचे ग्रंथ भेट

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठामध्ये शरण साहित्य अध्यासनास मंजुरी मिळाल्याबद्दल बसव केंद्र कोल्हापूर आणि महाराष्ट्र बसव परिषदतर्फे या अध्यासनासाठी ११ हजार रुपयांचे ग्रंथभेट विद्यापीठाला देण्यात आली. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्याकडे डॉ. जी. पी. माळी यांच्या हस्ते ग्रंथ सुपूर्द केले. भारतीय राज्यघटनेतील लोकशाही मूल्ये, संसदीय कार्यपद्धतीची संकल्पना, अभिव्यक्ती स्वातंत्र्य, समता, न्याय ही मूल्ये शरणांच्या वचन साहित्यात आढळतात. साहित्याच्या अंगाने अनेक विद्याशाखीय सहसंबंधांच्या दृष्टीने भारतीय राज्यघटनेतील मूल्यांच्या अनुषंगाने आणि संशोधनाच्यादृष्टीने शरण साहित्याचा अभ्यास होणे गरजेचे असल्याने 'शरण साहित्य अध्यासन केंद्र' या नावाने विद्यापीठामध्ये अध्यासन केंद्र स्थापन करण्याचा ठराव मंजूर झाल्याने याबाबतची अनेक वर्षांची मागणी पूर्ण झाली. या केंद्रासाठी काही मौलिक शरण साहित्य संपदा भेट म्हणून पाठविले असून, शक्य ते सहकार्य केले जाईल, असे पत्र बसव परिषदेने कुलगुरू डॉ. शिर्के यांना यावेळी दिले. यावेळी सरलताई पाटील, राजशेखर तंबाके, बाबूराव तारळी, सुभाष झगडे, चंद्रशेखर बटकडली, विलास आंबोळे, रमेश लिधडे, सुरेखा अडके, डॉ. नितीन माळी, शशिकांत पंचगल्ले, इरण्णा उडचण्ण, चारुशीला तासगावे, शशी हुक्केरी, शिवकुमार धायडे, अभिषेक मिठारी आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

23 APR 2023

पुढारी

# विविध कार्यकारी सह. संस्थांचे क्षमतावर्धन आवश्यक

## मराठे : विद्यापीठात सहकार प्रशिक्षण कार्यक्रम

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

कृषी क्षेत्राच्या विकासासाठी विविध कार्यकारी सहकारी संस्थांचे क्षमतावर्धन आवश्यक आहे, असे प्रतिपादन भारतीय रिझर्व्ह बँकेचे संचालक सतीश मराठे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ बँक ऑफ इंडिया अध्यासन व गुरूवर्य लक्ष्मणराव इनामदार सहकार प्रशिक्षण केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यांतील विविध कार्यकारी सहकारी सोसायटींच्या कर्मचाऱ्यांसाठी आयोजित 'ग्रामीण विकासात प्राथमिक कृषी पतसंस्थांची भूमिका' विषयावरील एक दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांची उपस्थिती होती.

मराठे यांनी भाषणात भारतीय विकास संस्थांची सूक्ष्म आकडेवारी मांडली. केंद्र शासन खेड्यांचा विकास करण्यासाठी विकास संस्थांना भरीव मदत करण्यासाठी करीत असलेल्या प्रयत्नांची माहिती दिली. यामध्ये अधिक प्रगतिशील होण्याची आवश्यकता त्यांनी विविध आकडेवारीसह अधोरेखित केली. नेहरू मेमोरियल फेलो डॉक्टर परशुराम पाटील, विभागीय सहनिबंधक अरुण काकडे यांनी मार्गदर्शन केले. डॉ. मुरुडकर, एस. बी. जाधव, बिपिन मोहिते व नारायण परजणे या तज्ज्ञांनी विविध विषयांवर प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन केले.

बँक ऑफ इंडिया अध्यासनाचे समन्वयक डॉ. राजन पडवळ यांनी स्वागत केले. अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी प्रास्ताविक केले. डॉ. केदार मारूलकर यांनी आभार मानले. या प्रशिक्षणास शाहूवाडी, पन्हाळा व करवीर तालुक्यांतील ९० संस्थांमधील १९० सदस्य उपस्थित होते.




**कोल्हापूर : विद्यापीठात आयोजित प्रशिक्षण कार्यक्रमात मार्गदर्शन करताना रिझर्व्ह बँकेचे संचालक सतीश मराठे. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, डॉ. श्रीकृष्ण महाजन, अरुण काकडे.**

पुण्यनगरी

# महावीर अध्यासनास मधुबाला शेटे यांच्याकडून देणगी

कोल्हापूर : प्रतिभानगर येथील दिलीप शेटे व मधुबाला शेटे या दाम्पत्याने शिवाजी विद्यापीठाच्या भगवान महावीर अध्यासनाच्या प्रस्तावित इमारत बांधकामासाठी ११ हजार रुपयांची देणगी दिली. अध्यासनाचे प्राध्यापक डॉ. विजय ककडे यांच्याकडे देणगी सुपूर्द केली. याबद्दल कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव व्ही. एन. शिंदे, वित्त व लेखा अधिकारी अजित चौगुले यांनी त्यांचे अभिनंदन केले.

पुढारी

# 'विवेकानंद'मध्ये आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांचा सांस्कृतिक अदान-प्रदान कार्यक्रम

कोल्हापूर : विवेकानंद कॉलेजमध्ये अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष व इंटरनॅशनल अफेअर्स सेल, शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने ऑसम अॅब्रॉड- कनेक्ट अॅक्टिव्हिटी कार्यक्रम झाला. यामध्ये सांस्कृतिक अदान-प्रदानसाठी नेपाळ, बांगला देश, इथोओपिया, सुदान, अफगाणिस्तान, मंगोलियातील १२ विद्यार्थ्यांशी संवाद आयोजित केला होता. प्रमुख पाहुणे म्हणून विद्यापीठाच्या इंटरनॅशनल अफेअर्स सेलचे संचालक डॉ. एस. बी. सादळे उपस्थित होते. आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांनी आपापल्या देशातील संस्कृतींचे नृत्य, गायन, विविध कलाप्रकारांद्वारे दर्शन घडविले. प्रास्ताविक अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षच्या समन्व्यक डॉ. श्रुती जोशी यांनी केले. सूत्रसंचालन ज्योती कुमावत, अॅन्सी बंडी यांनी केले. रोहित पाटील यांनी आभार मानले. यावेळी डॉ. रेवती पाटील, डॉ. व्ही. बी. वाघमारे, डॉ. सी. बी. पाटील, डॉ. जी. जे. नवाथे, डॉ. कैलास पाटील, डॉ कविता तिवडे, प्रा. सुप्रिया पाटील उपस्थित होते.

तरुण भारत

# सर्व आस्थापनांनी ई-आर-१ विवरणपत्र ३० एप्रिलपर्यंत भरावे

कोल्हापूर : सर्व शासकीय, निमशासकीय, केंद्र व राज्य शासन अंगिकृत, खासगी क्षेत्रातील सर्व आस्थापनांनी त्यांच्या कार्यालयाचे ई-आर-१ विवरणपत्र ३० एप्रिलपर्यंत ऑनलाईन पध्दतीने भरावे, असे आवाहन कौशल्य विकास रोजगार व उद्योजकताचे सहायक आयुक्त संजय माळी यांनी केले. मार्च २०२३ रोजी संपणाऱ्या तिमाहीची ई-आर-१ (त्रैमासिक) सर्व क्षेत्रातील शासकीय, निमशासकीय आस्थापनांकडून कर्मचाऱ्यांची सांख्यिकी माहिती (पुरुष/स्त्री) संकलीत करण्याचे काम सुरू आहे. सांख्यिकी विभागाकडून यापूर्वीच युजरनेम व पासवर्ड देण्यात आले आहेत. ई-आर रिटर्नची सांख्यिकी माहिती प्रत्येक तिमाही नंतर प्रत्येक महिन्याच्या १ ते ३० तारखेपर्यंत भरणे आवश्यक आहे. अधिक माहितीसाठी www.rojgar.mahaswayam.gov.in संकेतस्थळावर भेट द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.